MHJN080001242026

## <u>निशाणी क्रमांक ०१ वरील आदेश</u>
## (पारीत दि.१६/०३/२०२६)

प्रस्तुतचा अर्ज अर्जदारांनी मुंबई विनियमचे कलम ३ व ७ अन्वये <u>त्रिंबक पि. शंकर येडे</u> (येथुन पुढे '**<u>मयत</u>**' असे संबोधण्यात येईल) यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी केला आहे.

२) अर्जदारांनी असे कथन केले की, मयत हे अर्जदार क्र.१ पती तर अर्जदार क्र.२ ते ५ हे वडील होते. मयत हे दि.१७/०२/२००७ रोजी मौजे मुंबई येथे मरण पावले आहेत. मयत हे मौजे गाढे सावरगाव, ता.घनसावंगी, जि.जालना येथील रहिवाशी होते. अर्जदार हे मयताचे एकमेव कायदेशीर वारस आहेत. अर्जदारांना खाजगी, शासकीय व निमशासकीय कामे करण्यासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३) अर्ज दाखल झाल्यानंतर दैनिक आनंद नगरी या वृत्तपत्रात दिनांक ३१/०१/२०२६ रोजी जाहीर प्रगटन (निशाणी क्र.०९) प्रकाशित करण्यात आले व त्याद्वारे हरकत मागविण्यात आली. जाहीर प्रगटन प्रकाशित होऊन देखील आजपावेतो अर्जास हरकत घेण्यास किंवा विरोध करण्यास कुणीही उपस्थित झाले नाही.

४) अर्जदार क्र.०१ ने त्यांचे पुराव्याचे शपथपत्र निशाणी क्र.०८ प्रमाणे दाखल केले आहे. तोंडी पुरावा सोडून अर्जदारांनी निशाणी क्र.०९ वरील जाहीर प्रगटन, निशाणी क्र.१० वरील मयताचे मृत्यू प्रमाणपत्र, निशाणी क्र.११ वरील वारसाचे प्रमाणपत्र, निशाणी क्र.१२ ते १६ वरील अर्जदारांच्या आधारकार्डांच्या प्रती, ईत्यादीचा आधार घेतलेला आहे. अर्जदारांनी, निशाणी क्र.१७ वर पुरावा बंद पुरशिस दाखल केली.

५) निशाणी क्र.१० वरील मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्रिंबक शंकर येडे हे दिनांक १७/०७/२००७ रोजी मरण पावले आहेत. अर्जदारांनी दाखल केलेल्या पुराव्यास कुणीही आव्हानित केले नाही. दिनांक ३१/०१/२०२६ रोजी दैनिक आनंद नगरी या वृत्तपत्रात जाहीर प्रगटन प्रकाशित होऊन देखील आजपावेतो अर्जदारांच्या अर्जास हरकत घेण्यास किंवा विरोध करण्यास कुणीही हजर झाले नाही. अर्जदारांनी केलेली कथने व दिलेला पुरावा यावर अविश्वास ठेवावा, असे कोणतेही कारण अभिलेखावर आलेले नाही.

६) अर्जदारांनी दिलेला पुरावा, अर्जातील कथने, वस्तुस्थिती व अर्जदारांच्या वकिलांचा युक्तीवाद विचारात घेता अर्जदार हे वारस प्रमाणपत्र मिळण्यास पात्र आहेत, या निष्कर्षापर्यंत मी आलो आहे. अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. म्हणून मी खालील प्रमाणे आदेश पारीत करतो :–

**आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ कांता भ्र. त्रिंबक येडे, अर्जदार क्र.२ श्रीमंत पि. त्रिंबक येडे व अर्जदार क्र.३ शैलेंद्र त्रिंबक येडे, १ ते ३ रा. गाढे सावरगाव, ता.घनसावंगी, जि.जालना, ह.मु. शिवाजी नगर, घोडबंदर रोड, शमशाणभुमी रोड, गणेश अपार्टमेंटच्या मागे, चितलसर, मानपाडा, ठाणे पश्चिम ठाणे मुंबई, अर्जदार क्र.४ सविता भ्र. सुरेश खंडागळे, रा.शहापुर, ता.अंबड, जि.जालना व अर्जदार क्र.५ कविता भ्र. आत्माराम प्रधान, रा.वाई, ता.मंठा, जि.जालना यांच्या नावे मयत त्रिंबक पि. शंकर येडे यांचे वारस असल्याबाबत नियमाप्रमाणे वारस प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. अर्जाचे कामकाज बंद करण्यात येते.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by CHETAN SURESH JAGTAP
Date: 2026.03.16 16:19:35 +0530

(चेतन जगताप)

दिनांक १६/०३/२०२६

दिवाणी न्यायाधीश (क. स्तर)
घनसावंगी.